पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ३१ • जून २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## मराठी भाषा संवर्धन समितीची प्रथम बैठक

पुणे महानगरपालिका अंतर्गत मराठी भाषा संवर्धन समिती मा. महापौर, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी सन २०१३-१४ या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु. १०.०० लाख तरतुद करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये महानगरपालिके तील सर्व पदाधिकारी, समित्यांचे अध्यक्ष, महापालिका आयुक्त, मराठी भाषेतील तज्ञ व्यक्ती यांचा समावेश आहे.

मराठी भाषा संवर्धन समितीची पहिली बैठक दिनांक २८/६/२०१३ रोजी दुपारी ३ वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृहामध्ये संपन्न झाली. सदर बैठकीस मा.सौ.वैशाली बनकर, महापौर, पुणे, मा.श्री. सुभाष जगताप, सभागृह नेते, मा. श्रीमती. सुमन पठारे, अध्यक्षा, विधी समिती, मा. श्रीमती लता राजगुरु, अध्यक्षा, शहर सुधारणा समिती, मा. सौ.वैशाली मराठे, अध्यक्षा, महिला बालकल्याण समिती, मा. श्री. अनिल टिंगरे, अध्यक्ष, क्रीडा समिती, मा. श्री.अशोक हरणावळ, पक्षनेता, शिवसेना, मा. श्री. बाबु वागसकर, प्रतिनिधी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मा. श्री.राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ईस्टेट), श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. डॉ. न.म.जोशी, सुप्रसिध्द साहित्यिक व शिक्षणतज्ञ, मा. डॉ. विद्यागौरी टिळक, मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ, मा. श्री. अनिल गोरे, अध्यक्ष, समर्थ मराठी संस्था, मा. श्री. सुधिर नारखेडे, सदस्य, मराठी विज्ञान कार्यकारिणी परिषद, मा. श्री. शाम भुर्के, मराठी भाषेचे प्रसारक, मा. श्री. संजय भगत, मराठी भाषेचे प्रसारक, मा. श्री. प्रदीप निफाडकर, अभ्यागत संपादक, मराठी विश्वकोष मंडळ, इत्यादी सदस्य उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये मा. महापौर, पुणे यांनी सर्व सदस्यांचे स्वागत केले व मराठी भाषा संवर्धन समितीच्या पहिल्या बैठकीचे उपस्थितीपत्रकावर मराठी स्वाक्षरी करुन बैठकीस सुरुवात केली. तदनंतर उपस्थित सदस्यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी आपल्या मार्गदर्शक सूचना कराव्यात, असे मा. महापौर यांनी सूचित केले. त्या अनुषंगाने सर्व सदस्यांनी मराठी भाषेसंदर्भात विविध उपक्रम उदा. इमारतींची व घरांची नावे मराठीत असावीत, महापालिकेचा पत्रव्यवहार मराठीतून करण्यात यावा, महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी मराठीत स्वाक्षरी करावी, मराठी शुध्द शब्दकोष शाळेतील विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावेत, मराठी भाषेच्या प्रसारासाठी मराठी प्रशिक्षणे आयोजित करावीत, मराठी भाषा डॉट कॉम या संकेतस्थळाचा वापर करणेबाबत प्रचार करावा, इत्यादी सूचना केल्या.

सदर बैठकीमध्ये १. छत्रपती शिवरायांचा राज्यव्यवहार कोष पुणे महानगरपालिकेतर्फे मराठी भाषेत प्रसिध्द करणे, २. पाच सदस्यांची उपसमिती गठित करणे, ३. मा. श्री. माधवी वैद्य, पहिल्या महिला अध्यक्षा, महाराष्ट्र साहित्य परिषद यांची मराठी भाषा संवर्धन समितीमध्ये सदस्य म्हणून निवड करणे, इत्यादी निर्णय घेण्यात आले.

त्यानंतर ना.मा.उदय सामंत, आमदार यांची मराठी भाषा विभाग, राज्यमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल सर्व सदस्यांनी त्यांचे अभिनंदनाचा एकमताने ठराव मंजूर केला.

सदर बैठकीचे आभार प्रदर्शन मा.श्रीमती लता राजगुरु, अध्यक्षा, शहर सुधारणा समिती यांनी केले.

## पुणे महानगरपालिकेस वसुंधरा पुरस्कार २०१३ प्रदान

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला वसुंधरा पुरस्कार, २०१३ चा महापालिका स्तरावरील प्रथम पुरस्कार पुणे महानगरपालिकेस प्राप्त झाला. मा.ना.अजित पवार, उप मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात मा. ना.पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र यांचे हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.




वसुंधरा पुरस्काराचे स्वरुप स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व रुपये ५ लाखाचा धनादेश असे आहे. त्याचप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या वतीने व फिल्मस्मिथ वर्कशॉप यांच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या कचरा मुक्तीच्या दिशेने या लघुपटास प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व रुपये दोन लाख रकमेचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांचे हस्ते दोन्ही पुरस्कार मा. श्रीमती वैशाली बनकर, महापौर, मा.श्री.महेश पाठक, महापालिका आयुक्त, मा.श्री.सुरेश जगताप, सह महापालिका आयुक्त, श्रीमती मिनल कारेकर व श्रीमती स्वप्ना पाटसकर, माहितीपटाचे दिग्दर्शक, डॉ. केतकी घाटगे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी व श्री. मंगेश दिघे यांनी स्विकारला.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना मा. मुख्यमंत्री यांनी सांगितले की, नैसर्गिक संपत्तीचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असून, नैसर्गिक संपत्ती संपण्याच्या मार्गावर आहे. ही संपदा पुढे वाढ होणे अवघड आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होवून ग्लोबल वॉर्मिंग सारखे प्रश्न मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहेत. त्यामुळे शासन स्तरावर तसेच, विविध लोकसहभागातून पर्यावरण संवर्धन व संरक्षणाकरिता मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

## माहे जून, २०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.२९/६/१३ रोजी कै. वडके हॉल येथे जून, १३ मधील सेवानिवृत्त ५० अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये ४७ वयपरत्वे व ३ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा.डॉ.वैशाली जाधव, प्र.आरोग्य प्रमुख या उपस्थित होत्या. तसेच, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, मा. तुकाराम जगताप, सल्लागार, पीएमसी एम्प्लॉईज युनियन हे उपस्थित होते.



प्रास्ताविकात मा.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली व सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांना त्यांच्या सेवापूर्तीप्रित्यर्थ मिळणाऱ्या सर्व देय रकमांचा योग्य विनियोग करणेबाबत मार्गदर्शन करुन भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच, मा. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन यांनी सर्व सेवानिवृत्त सेवकांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.

तदनंतर प्र.आरोग्य प्रमुख डॉ. वैशाली जाधव यांनी सेवानिवृत्त सेवकांनी वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. मनपाची दीर्घ सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचे आभार मानले व सर्वांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.त्यानंतर सेवानिवृत सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्हे देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अलका जोशी यांनी व आभार प्रदर्शन श्रीमती सुचेता महाबळेश्वरकर यांनी केले.

## हायर/लोअर डिपार्टमेंटल परीक्षा २०१३

पुणे महानगरपालिकेतील लेखनिकी संवर्गातील ज्युनिअर ग्रेड लेखनिक सेवकांच्या लोअर/हायर डिपार्टमेंटल परीक्षा नोव्हेंबर, २०१३ मध्ये आयोजित करण्यात आल्या आहेत. सदर परीक्षांचे अर्ज दिनांक १५/७/२०१३ ते १६/८/२०१३ अखेर सेवकवर्ग विभाग कार्यालयामध्ये विनामुल्य उपलब्ध आहेत. सदर अर्जांची मुदत दिनांक २३/८/२०१३ पर्यंत आहे. तरी, सर्व ज्यनिअर ग्रेड लेखनिकांनी याची नोंद घ्यावी.

# राणी लक्ष्मीबाई

ज्यांच्याकडून आदर्श घ्यावा असे बरेच पराक्रमी वीर हिंदुस्थानातील १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात चमकले. त्या सर्वांमध्ये असामान्य पराक्रम गाजवणाऱ्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाई।

चिमाजी अप्पांचे व्यवस्थापक मोरोपंत तांबे व भागिरथीबाई यांच्या पोटी १९ नोव्हेंबर १८३५ रोजी राणी लक्ष्मीबाई यांचा जन्म झाला. मोरोपंतांनी आपल्या कन्येचे नाव मनुताई असे ठेवले. मनुताई लहानपणापासून हुषार व देखणी होती. मनू पाच वर्षांची असताना तिच्यावरचे मातृछत्र हरपले.

हुषार असलेल्या मनुताईला दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी हेरले. ब्रह्मावर्त येथील वाड्यात नानासाहेब पेशवे व रावसाहेब यांच्यासह चिमुकल्या मनुताईने तलवार, दांडपट्टा व बंदुक चालविणे तसेच घोडदौडीचे शिक्षण घेतले. युध्दातील डावपेच लक्षात घेवून मनुताईने मोडी लिपीतील पुरेसे शिक्षणही घेतले.

वयाच्या सातव्या वर्षी मनुताई झाशी संस्थानचे अधिपती गंगाधरराव नेवाळकर यांच्याशी विवाहबध्द झाली. विवाहपश्चात मोरोपंतांच्या मनुताईला झाशीची राणी लक्ष्मीबाई म्हणून संबोधले जावू लागले.

विवाहानंतरचा काही काळ मजेत गेल्यानंतर लक्ष्मीबाईंच्या संघर्षाला खरी सुरवात झाली. गंगाधरराव नेवाळकर व लक्ष्मीबाई यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. परंतु अवघ्या तीन महिन्यातच काळाने त्यांच्यावर झडप घालून त्यांच्यापासून ते हिरावून नेले. त्यानंतर पुत्रवियोगाचा धक्का सहन न करु शकलेले गंगाधररावही काही दिवसातच चालते झाले.

राणी लक्ष्मीबाईंवरील कौटुंबिक संकटाची मालिका संपत नाही तोच १८५४ मध्ये ब्रिटीशांनी झाशीचे संस्थान खालसा करुन टाकले. झाशी खालसा झाल्याचे वृत्त ऐकताच राणी लक्ष्मीबाई चवताळल्या. त्यात ब्रिटीश अधिकारी मेजर एलिस लक्ष्मीबाई यांना भेटण्यासाठी आला. त्यावेळी संतापलेल्या झाशीच्या वाघिणीने एलिसवर मेरी झाशी नहीं दूंगी, अशी डरकाळी फोडली.

इंग्रजांची संस्थाने बरखास्त करुन भारत घशात घालण्याच्या उपक्रमाला १८५७ च्या उठावाच्या रुपाने विरोध सुरु झाला. या स्वातंत्र्यसंग्रामात दिल्ली, बरेली पाठोपाठ झाशीही पेटले. मोठ्या कौशल्याने राणी लक्ष्मीबाई यांनी झाशीला ब्रिटीशांच्या तावडीतून सोडविले. झाशी स्वतंत्र झाली.

त्यानंतर त्यांनी इंग्रजांच्या संभाव्या हल्ल्यातून झाशीचे रक्षण करण्याच्या दृष्टीने सिध्दता केली. लक्ष्मीबाई यांना जिवंत पकडून आणण्यासाठी सर ह्यू रोज यांची नेमणूक ब्रिटीशांनी केली. सर ह्यू रोज यांनी आपल्या सैन्यासह झाशीवर हल्ला करण्यासाठी तळ ठोकला. परंतु वीरांगणा लक्ष्मीबाई या स्वत: झाशीच्या तटावर उभे राहून सैन्याला लढण्यास स्फूर्ती देत होत्या. लढाई सुरु होवून तीन दिवस उलटूनही झाशीवर विजय मिळवता येत नसल्याने ह्यू रोजने फितुरी करुन झाशीत प्रवेश केला. झाशीतील नागरिकांची इंग्रजांनी लुट करण्यास सुरुवात केली. त्यानंतर राणी लक्ष्मीबाई यांनी शत्रूची फळी तोडून पेशव्यांच्या सान्निध्यात गेल्या. मोचक्याच सैन्यासोबत अवघ्या १२ वर्षांच्या आपल्या मुलास पाठीशी बांधून राणी लक्ष्मीबाई किल्ल्याबाहेर पडल्या.

ग्वाल्हेरकडे सर ह्यू रोजने आपल्या सैन्याचा मोर्चा वळवला. आता रोजशी दोन हात करण्यासाठी राणी लक्ष्मीबाई यांनी निर्णय घेतला होता. त्यांनी पेशव्यांच्या मदतीने रोजविरुध्द युध्द पुकारुन ग्वाल्हेरच्या पूर्व बाजूचे रक्षण करण्याची जबाबदारी स्वत: लक्ष्मीबाई यांनी स्विकारली.

युध्दातील लक्ष्मीबाई यांच्या पराक्रमी शौर्यापुढे ब्रिटीश हताश होवून माघारी परतले. परंतु १८ जूनला ब्रिटीशांनी ग्वाल्हेरवर चहूबाजूंनी अचानक हल्ला केला. तेंव्हाही त्या इंग्रजांना शरण गेल्या नाहीत. शत्रूची फळी फोडून बाहेर जात असतानाच त्यांच्या मार्गात एक ओढा आडवा आला. राणी लक्ष्मीबाई यांचा राजरत्न घोडा नसल्याने दुसरा घोडा ओढ्याजवळच गरगरु लागला. ओढ्यापाशी राणी लक्ष्मीबाईंना इंग्रजांनी घेरले. तिथे इंग्रजांशी लढत असताना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होवून घोड्यावरुन खाली कोसळल्या. परंतु पुरुषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाही. ते पुढे निघून गेले. घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांनी त्यांच्या सेवकाने एका मठात आणले. परंतु उपचार न करण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षी वीरमरण स्विकारले.

अशा वीरांगणा झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या चरणी शतश: प्रणाम.

# ओळख गुणवंताची - श्री. लक्ष्मीकांत दामोदर शिंदे

ओळख गुणवंताची या सदरात आपण श्री. लक्ष्मीकांत दामोदर शिंदे, रखवालदार, सुरक्षा विभाग यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्री. लक्ष्मीकांत दामोदर शिंदे यांचा जन्म दिनांक २९/६/१९७० साली पुण्यात झाला. त्यांचे वडिल श्री. दामोदर लक्ष्मण शिंदे हे पुणे महानगरपालिकेकीत मोकादम या पदावरुन सन १९९७ साली सेवानिवृत्त झाले.

श्री. शिंदे यांचे शिक्षण भारत इंग्लिश स्कुल येथे झाले. १९९५ साली ते दहावी परीक्षा उत्तीर्ण झाले. दहावीमध्ये असतानाच त्यांनी इंग्रजी व मराठी टायपिंगचा कोर्स पूर्ण केला. श्री. शिंदे यांना क्रिकेट व कबड्डी या खेळांची आवड होती.

त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण यशवंतराव मोहिते कॉलेज, कोथरुड येथे झाले. बारावीनंतरचे शिक्षण त्यांनी मराठवाडा कॉलेज ऑफ कॉमर्स, डेक्कन येथे पूर्ण केले.

महाविद्यालयीन शिक्षण चालू असतानाच त्यांनी विविध ठिकाणी कामे केली. चार्टर्ड अकौंटंटकडे तसेच वसुली क्षेत्रात कामे केली. १९९४ मध्ये श्री. शिंदे यांचा विवाह झाला. घरातील आर्थिक जबाबदारी वाढली. त्यांनी गुजरात लिज ॲण्ड फायनान्स मध्ये काम केले.

१९९४ मध्ये श्री. शिंदे यांची पुणे महानगरपालिकेत सुरक्षा रखवालदार या पदावर नेमणूक झाली. सेवेत असतानाही त्यांनी खेळाची आवड जोपासली. १९९५-९६



साली पुणे विद्यापीठ व राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांमध्ये अजिंक्यपद मिळविले. पुणे महानगरपालिकेतील कामगार कल्याण निधी व युनियनसंदर्भातील सर्व कार्यक्रमात ते सक्रीय सहभागी असतात.

सन २००७ साली पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित आंतरमहानगरपालिका क्रिकेट स्पर्धेत मॅन ऑफ द सिरिज तसेच पुणे जिल्हा आंतरकचेरी क्रिकेट संघटनेतर्फे आयोजित समर लिग २००५-०६ च्या स्पर्धेत उत्कृष्ट गोलंदाज पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. याबरोबर त्यांना क्रिकेट स्पर्धांमधील अनेक बक्षिसे मिळाली आहेत.

किल्लारी गावी झालेल्या भूकंपाचे वेळी श्री.शिंदे यांनी नागरी संरक्षण दलातर्फे मदतनीस म्हणून काम केले. अनेकदा विविध रक्तदान शिबिरांमध्ये ते सहभागी झाले आहेत.

श्री. शिंदे पुणे मनपा कामगार दिंडीस दरवर्षी उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. सेवेत असतानाच ते एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण झाले. सार्वजनिक वाचनालयांना व गरिब विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात. महापालिकेच्या क्रिडा स्पर्धा आयोजनामध्येही समन्वयक म्हणून त्यांची महत्वपुर्ण कामगिरी आहे..

श्री. शिंदे यांना २००९-१० मध्ये कामगार कल्याण निधी, पुणे महानगरपालिकेमार्फत गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

श्री. शिंदे यांच्या पुढील वाटचालीस कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा।

# पगारपत्रक लेखनिकांसाठी महत्वाच्या सूचना

- वेतनप्रदान अधिनियम, १९३६ मधील विहित तरतुदीनुसार संस्थेमधील सर्व कर्मचाऱ्यांना विहित कालावधीत वेतन आदा करणे बंधनकारक आहे. विलंबाने आदा केलेल्या वेतनावर १० पट दंड आकारला जावू शकतो.
- उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार कायदेशीर वजावटीशिवाय सेवकांच्या वेतनातून त्यांच्या लेखी संमतीशिवाय इतर वजावटी करता येत नाहीत. सर्वसाधारणपणे कर्मचाऱ्याच्या एकूण वेतनातून ५०% पर्यंत वजावटी अनुज्ञेय आहेत. सहकारी संस्थांच्या कर्जफेड असल्यास कमाल ७५% पर्यंत वजावटी करता येतात.
- किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार एखाद्या कर्मचाऱ्यास त्याच्या गैरवर्तनाबाबत त्यास एकुण पगाराच्या ३% पर्यंत दंड करता येवू शकतो.
- सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना नियत दिनांकास देय रकमा (शिल्लक रजा, भविष्य निर्वाह निधी, इत्यादी) देणे बंधनकारक आहे.
- सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन व देय रकमा प्रदान करण्यास सहा महिन्यांपेक्षा जास्त विलंब लागल्यास, उपदान व निवृत्ती वेतन रकमेवर सहा महिने पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या महिन्याच्या तारखेपासून दरवर्षी १०% दराने व्याज देण्याची तरतुद शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे.
- सेवानिवृत्ती प्रकरणे विहित मुदतीत निकाली काढणेसाठी मा.महापालिका आयुक्त वा मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी प्रसृत केलेल्या आदेश/सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.
- कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील विविध नोंदी रजा हिशेब अद्ययावत ठेवून वेळीच संबंधितांची स्वाक्षरी घेण्यात यावी.
- सेवेत असताना मृत कर्मचाऱ्याच्या वारसास आणि मा.लाड कमिटीच्या शिफारशीनुसार देण्यात येणाऱ्या अनुक्रमे अनुकंपा तत्वावर व वारस नियुक्ती मिळण्याची मुदत एक वर्ष विहित करण्यात आली आहे.
- कामगार कल्याण निधीमार्फत देण्यात येणाऱ्या वारस अनुदानासाठी अर्ज करण्याची मुदत ६ महिन्यांपर्यंत आहे

# १ मे – महाराष्ट्र दिन

बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ।।धृ।।
विक्रम वैराग्य एक जागि नांदती
जरिपटका भगवा झेंडाही डोलती
धर्म–राजकारण समवेत च ऌती
शक्तियुक्ति एकवटूनी कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ।।०।।
प्रासाद कशास जेथे हृदयमंदिरे
सद्‌भावाचीच भव्यदिव्य आगरे
रत्ना वा मौक्तिकाही मूल्य मुळि नुरे
रमणीची कुस जिथे नृमणिखनि ठरे
शुध्द तिचे शीलहि उजळवि गृहागृहा।।

खरेच माझ्या महाराष्ट्राची महती गाताना वाणी आणि लेखणी अपुरी ठरेल, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. माझ्या महाराष्ट्राची माती संतांमुळे पावन झालेली आहे. माझ्या महाराष्ट्रात संत, थोर वीर पुरुष, वीरांगणा या सर्वांनी महाराष्ट्राला परमोच्च स्थान दिले आहे. याच महाराष्ट्रानी आम्हाला संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज, समर्थ रामदास स्वामी, मुक्ताबाई, राजमाता जिजाबाई, सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी, गार्गी (आर्यकालीन विदुषी) शिवाजी महाराज, संभाजी महाराज, महात्मा फुले, इत्यादी थोर पुरुष आणि कित्येक लेखक आणि लेखिका, कवी–कवयित्री या महाराष्ट्रांनी या महाराष्ट्र भूमीला दिलेले आहेत. या सर्वांच्या भक्तीने, शौर्यांने महाराष्ट्र देश पावन व पवित्र झालेला आहे.

तर आपण याच महाराष्ट्राचा इतिहास थोडक्यात पाहू. कारण सहजासहजी महाराष्ट्राला स्वातंत्र्य मिळाले नाही. कुठलेही परिवर्तन आणि क्रांती ही सहजासहजी होत नाही. ती रक्तरंजितच असते. या उक्तीप्रमाणे महाराष्ट्राला याच मार्गाने स्वतंत्र करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभारली गेली. या चळवळीमुळे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक, राजकीय या सर्व अंगांनी ही चळवळ उभी राहिली. ब्रिटिशांनी आपल्या राज्य कारभारासाठी भारताची विभागणी वेगवेगळ्या प्रांतात केली होती. परंतु ती भाषेप्रमाणे नव्हती.१९२० मध्ये नागपुरात झालेल्या काँग्रेस अधिवेशनाचे वेळी भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा महात्मा गांधी यांनी मान्य केला होता. लोकमान्य टिळक हे देखील भाषावार प्रांतरचनेच्या बाजूने होते. काँग्रेसनेच एकेकाळी मान्य केलेला हा मुद्दा स्वातंत्र्यानंतर मात्र पक्षाला विशेषत: पं.नेहरुंना संकुचित व राष्ट्रीय एकात्मतेला धोकादायक वाटू लागला. मुंबईतील भांडवलदारांना जे मुख्यत: अमहाराष्ट्रीय होते, त्यांचा मुंबई महाराष्ट्राला द्यायला कडाडून विरोध होता.

१९४६ चे साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली व संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे तीन ठराव साहित्यिकांनी पाठविले, ज्याला राजकीय नेत्यांनी पाठिंबा दिला. १९४६ मध्ये भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेत स.का.पाटील यांनी मुंबईला

**सौ.अलका जोशी,**
**सल्लागार (कामगार) कार्यालय**

महाराष्ट्राची राजधानी करण्यास विरोध केला. फाजल अली आयोग डिसेंबर १९५३ मध्ये फाजलअली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची नियुक्ती झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या वतीने एस.एम.जोशी, धनंजय गाडगीळ यांच्यासह इतरांनी आयोगासमोर आपली बाजू मांडली. १९५५ मध्ये आयोगाचा निवाडा जाहीर केला आणि त्यात पुनर्रचनेबाबत मोठी विसंगती होती. हैद्राबादसाठी एकभाषिकाचे तर मुंबईसाठी द्वैभाषिकाचे. मुंबईच्या विकासासाठी तिला गुजरातपासून वेगळे ठेवणे योग्य नाही व बेळगाव भाग कर्नाटकाशी आर्थिकदृष्ट्या जोडला असल्याचे तसेच विदर्भ महाराष्ट्रात घातल्यास नागपूर शहराचे महत्व कमी होईल, असे अहवालात नमूद करण्यात आले हाते. आयोगाला या द्वैभाषिकात मराठी भाषिकांची संख्या गुजराती भाषिकांपेक्षा जास्त होवू द्यायची नव्हती, असेच या विसंगतीचे कारण म्हणावे लागेल.

या आयोगाच्या विरोधात महाराष्ट्रभर डोंब उसळला. नेहरुंनी त्यामुळे सौराष्ट्रसह गुजरात, विदर्भासह महाराष्ट्र व स्वतंत्र मुंबई अशी त्रिराज्य योजनेत महाराष्ट्रापासून मुंबई तोडल्यामुळे अन्यायाची भावना मराठीजनांत पसरली व संयुक्त महाराष्ट्र चळवळीने पेट घेतला. मुंबई संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, हे आंदोलनाचे घोषवाक्य बनले. महाराष्ट्रीय काँग्रेस नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वासमोर गुडघे टेकले. यामुळे काँग्रेस नेते जनतेच्या नजरेतून उतरले. सेनापती बापट, एस.एम.जोशी, आचार्य अत्रे, कॉ.श्रीपाद डांगे, शाहीर अमरशेख प्रबोधनकार ठाकरे हे चळवळीतील महत्वाचे नेते ठरले.

मोरारजी देसाई यांनी २० नोव्हेंबर, १९५५ मध्ये काँग्रेस जिवंत असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, तसेच गुंडगिरीला योग्य जबाब मिळेल, अशी विधाने केली. १९५६ मध्ये केंद्रशासित मुंबईची घोषणा केल्यानंतर लोक रस्त्यांवर उतरले. त्यावर मोरारजी देसाईंच्या सरकारने बेछूट निष्ठुरपणे गोळीबार केला. त्यात १०५ जणांना प्राण गमवावा लागला.

१ नोव्हेंबर, १९५६ रोजी केंद्राने सर्व मराठी प्रदेश मिळून विशाल द्विभाषिक स्थापले. द्विभाषकाची विभागणी करताना महाराष्ट्र राज्याने गुजरातला दहा कोटी द्यायचे व पुढील चार वर्षात ती रक्कम कमी करत आणायची, अशी अट मान्य झाली. मुंबईचा विकास आणि उभारणी गुजराती भांडवलदारांनी केली असा दावा गुजराती भाषिक करीत होते. त्याचे व्याज म्हणून एकूण ५० कोटी देवूनच मुंबई महाराष्ट्राला मिळाली. नेहरुंना हवे असलेले मुंबई हे नाव वगळून समितीने महाराष्ट्र असे नाव ठरविले व राज्याची स्थापना कामगार दिनास म्हणजे १ मे रोजी केली गेली. महाराष्ट्र स्थापनेचा कलश पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते आणला गेला. नव्या राज्याची राजधानी मुंबई तर उपराजधानी नागपूर निश्चित झाली.

संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचे स्वप्न साकार झाल्यानंतर आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी १ मे या दिवसाला सोन्याचा दिवस असे संबोधले होते. या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलले होते की, महाराष्ट्राच्या निर्मितीमुळे आपल्याला भरभराटीचे आणि सुखाचे दिवस आले असून जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे हा महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मी माझे कर्तव्य समजतो. मराठी भाषिक प्रदेश एकत्र करुन जनताभिमुख सरकार देणे हे महाराष्ट्र राज्य स्थापनेमागील मुख्य धोरण आहे, हे सर्वांनी मनावर कोरुन ठेवावे.

१ मे १९६० हा मराठी भाषिकांच्या स्वप्नपूर्तीचा दिवस. या दिवशी यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या मंत्रिमंडळाने नवराज्याचा राज्यकारभार हाती घेतला. पण या क्षणांसाठी एकूण १०६ जणांनी हौतात्म्य पत्करले. संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्यासाठी व्यासपीठ असावे, यासाठी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. एस.एम.जाशी, प्रबोधनकार ठाकरे, सेनापती बापट, नाना पाटील, तुळशीदास जाधव, डॉ. धनंजय गाडगीळ, भाऊसाहेब हिरे, आचार्य अत्रे, प्रा.मधु दंडवते, इत्यादी अनेक महत्वाच्या व्यक्तिंनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी मोलाचे योगदान दिले. या महान व्यक्तिंचे आम्ही सदैव ऋणी राहू.

पण आज खरे एव्हाना महाराष्ट्राचे स्वरुप व संस्कृतीचे स्वरुप विस्कटलेले, बदललेले जाणवते. या महाराष्ट्राला लाभलेली संत पुरुषांची परंपरा, शुर आणि योध्दे या मातीसाठी प्राणपणाला लावण्यात आलेल्या स्वातंत्र्यवीराची, एका सरदाराकडून अपहृत करण्यात आलेल्या स्त्रीचा यथोचित आदर सत्कार करुन लेकीसुनासमान साडीचोळी करुन माहेरवाशीनसारखा सन्मान करणाऱ्या श्री. शिवाजी महाराजांचे, आपल्या धर्मासाठी स्वाभिमानाने आतोनात वेदना व छळ सहन करुनही परधर्माचा स्विकार न करता मरण पत्करलेले संभाजी महाराज, म.फुले ज्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार समाजाला न जुमानता केला. ज्यांनी स्त्री शिकावी म्हणून बोलके सुधारक न होता कर्ते सुधारक बनले आणि सावित्रीबाईंना प्रथम स्त्री शिक्षिका बनविले. विधवा सन्मान म्हणून तिच्या अपत्याला दत्तकपुत्र घेवून समाजाला एक नवा आदर्श घालून दिला.

पण आज खऱ्या अर्थाने या सर्व गोष्टींचे समाजाला कुठेतरी विस्मरण होत आहे हे नक्की. त्याशिवाय का समाजात आज दररोज खून, मारामाऱ्या, विनयभंग, हुंडाबळी, बलात्कार (अगदी ३–४ वर्षांपासून ते ५५–६० वर्षांपर्यंत) भ्रष्टाचार, बालविवाह, कुपोषण, वृक्षतोड, जंगले, निसर्गवैभव नष्ट करुन इमारतींचे जंगलेच जंगले उभे होताना दिसताहेत. आधुनिकतेचा पुरस्कार करताना मुळ आदर्श परंपरा, संस्कृतीपासून आपण भरकटत आहोत, दूर जात आहोत, याची प्रकर्षाने जाणीव होत आहे.

स्त्री भृण हत्या ही समाजाला तीव्रतेने जाणवणारी समस्या झाली आहे आणि त्याचबरोबर स्त्री सुरक्षा हा ही प्रश्न महाराष्ट्रात ऐरणीवर आला आहे. ज्या महाराष्ट्रात स्त्रीचा आदर सन्मान केला जायचा त्याच महाराष्ट्रात राजरोस स्त्रीवर, अजाण बालिकेवर अत्याचार होतात. निर्दयपणे स्त्री भृण हत्या होते. अत्यंत शोकनिय, निंदनीय बाबी आहेत. पण आज ना उद्या सर्वांना या गोष्टींची जाणीव होवून ही परिस्थिती नक्की सुधारेल. परत नैतिकता, मानवता, समता, बंधुता, प्रामाणिकपणा, एकनिष्ठता या सर्व मुल्यांचा सर्वजण स्विकार करतील, अशी आशा आहे. परत एकदा माझा महाराष्ट्र सर्वार्थाने सुजलाम सुफलाम होईल. परत एकदा आम्ही गर्वाने म्हणू की,

बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा

# साहसी योध्दा

**साहसी योध्दा**
**कभी मरता नहीं है**
**किसी कठिनाई से**
**वह डरता नहीं है!**

**आगे बढना–सदैव लडना**
**ध्येय मात्र, बस रहता यही है**
**साहसी योध्दा**
**कभी मरता नहीं है!**

**मुश्किलें–रुकावटे**
**आनी ही थी**
**होनी कुछ ऐसी**
**होनी ही थी!**

**चलता ही रहता**
**जो रुकता नहीं है**
**योध्दा असल में**
**होता वही है!**

**किसी कठिनाई से**
**वह डरता नहीं है**
**साहसी योध्दा**
**कभी मरता नहीं है!**

**साथ किसीका**
**जब मिलता नहीं हो**
**हौंसला फिर भी**
**जिसका ढलता नहीं हो!**

**जंग अकेले ही**
**जो लडता रहा है**
**योध्दा धैर्यवान भी**
**होता वही है!**

**साहसी योध्दा**
**कभी मरता नही है!**

**टिम–टिमातासा आज**
**दिखता यह राज हो**
**पर दीप कभी यह**
**बुझता नहीं है**

**साहसी योध्दा**
**कभी मरता नहीं है**
**साहसी योध्दा**
**कभी मरता नहीं है!**

राजदीप धुसिया
परवाना आकाशचिन्ह विभाग

## वाचकांसाठी...

❖ खातेप्रमुखांच्या कार्यालयाकडून दरमहा अंक उपलब्ध करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर/ सूचना फलकावर लावा.
❖ आपला अंक वाचून झाल्यावर दुसऱ्याला वाचण्यास द्या.
❖ अभिप्राय व सूचना द्या.
❖ नवीन स्तुत्य उपक्रम/योजना/ कार्यक्रमाचे फोटोसह संक्षिप्त वृत्त पाठवा.

# आपल्या आरोग्याचा आलेख

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए,ऐ, ओ, औ, अं, अ: असे अनुक्रमे उच्चारुन आरोग्यप्राप्ती कशी होते याचे निरुपण.

अ च्या उच्चाराने हृदयाला मजबुती येवून रक्त शुध्दी होते.

आ च्या उच्चाराने रोग प्रतिकारक शक्ती वाढते, आजार लवकर बरा होतो.

इ, ई च्या उच्चाराने श्वसनेंद्रिय स्वच्छ होते. डोके दुखी थांबते, राग व उदासिनतेचे प्रमाण कमी होते.

उ, ऊ च्या उच्चाराने बध्दकोष्टता होत नाही, पोट/आतडे निरोगी राहते.

ए, ऐ च्या उच्चाराने जननेंद्रियांचे रोग, न्युमोनिया बरे होतात, ग्रंथी स्त्रावतात.

अं, अ: च्या उच्चाराने आध्यात्मिक प्रगती होते, घशातून स्त्रवणारा रस पोटात जाऊन सर्व तऱ्हेचे विकार दूर करतो.

- अकार  'अ' कार तो शुध्दी, । 'आ' कार ती शक्ती ।
  श्वसनेंद्रियांसी 'इ' ने ची समृध्दी, ।।१।।
  तामसी उदास नाश पावती ।
  लोक हो ऐका ऐसे प्रभुत्व 'इ' चे ।।२।।
- उच्चार  उदर शुध्दीसी 'उ', 'ऊ' कार गरजावा।
  बध्दकोष्ठही जैसे पळवावा ।।३।।
  'ए', 'ऐ' चे ऐसे उच्चारणे । कंठासी स्त्रावणे।
  न्युमोनिया कारणे । रोग नाशीती ।।४।।
- आरोग्य  स्त्राव लाभदायी जो । 'ए', 'ऐ' उच्चारे प्राप्त होतो ।
  जननेंद्रिया निरोगी राखतो । ऐसा लाभदायी ।।५।।
  'ओ' 'औ' चा उच्चार । साधका आधार ।
  ज्ञान विज्ञानसहित, अभ्यास कराया ।।६।।
- साधना  'अं' 'अ:' उच्चारणे, अध्यात्मा कारणे ।
  यश, समृध्दी आपुल्या हाती ।।७।।

# बालमजुरी

बालमजुरीचा सरकार फोडितो टाहो वारंवार
जागोजागी दिसती परी बालके श्रम वेचताना
अल्लड, निरागस भाव चेहऱ्यावरचे गेले हरवूनी
रात्रंदिन उपहारगृहामध्ये राबराबूनी होतात घामाघूम
नसे हास्य तव चेहऱ्यावरती ना उत्साह दिसे
ना नशिबाशी ना भाग्याशी नसे काही उणे दुणे
आहे त्या परिस्थितीशी हासूनी सामोरे जाण्याची जिद्द
नयनी पाहता त्यांच्या उमगे केविलवाणी मुकी भाषा
हृदयाला पडतो पिळ पाहता त्यांना अतिश्रम वेचताना
तरी आनंदी हासतमुख असतात ही जीवन जगताना
नसे चैन नसे आराम नसे खेळावयासही वेळ
बालपणीच बालपण गेले हरवूनी आले प्रौढत्व
आई-बाप भाऊ-बहिणीची जबाबदारी आले जन्मा घेवून
हासत परी जातात सामोरे परमेश्वरालाच वाटावे अपराधी
निसर्ग नियमाप्रमाणे फुल फुलण्याआधी कोमेजते कधीकधी
आहे त्यात सुख मानूनी जीवन जगतात सुखी राहुनी
काट्यांमधूनी चालताना हृदय होते रक्तबंबाळ जरी
कोमेजल्या ह्या कळ्यांना परमेश्वरा तुझाच रे आधार
मानवंदना द्यावी तयांना हासत दिसता ही मुले
ईशचरणी एकच प्रार्थना आशिष असू दे तव ह्यांच्या शिरी

**अलका जोशी,**
**सल्लागार (कामगार) कार्यालय**

# अंतरंग जीवनाचे

विश्वाचीया गर्भात जीव जन्मांची अवंतरणे अनंत
चौऱ्यांशी योनी प्रवासाअंती जन्म मिळतो तो जणू हाच

सर्व प्राणीमात्रांत मनुष्य जीवालाच कर्म प्राप्त्यर्थ
उन्ह पावसाच्या खेळा सारखे मनुष्य जीवनाचे बदलती रंग

लख्ख प्रकाश, कधी धुसर धुक्यात, तर कधी किर्र अंधारात
इथे प्रत्येकाला शोधावी लागते आपुली वाट सदोदित

इथे एक न दुसऱ्या सारखा न दुसरा तिसऱ्या सारखा
कारण प्रत्येक जण आहे आपल्याच सारखा...

"क्योकी" विश्व विधात्याने प्रारब्दरुपी लेखनीने
रेखाटल्या जणू मनुष्य जीवनाच्या त्या अगणित छटा

कोणीच नसे अजराअमर इथे तर सर्वच मौल्यवान
केवळ दान मनुष्याला दैदिप्यमान कांती उमटविण्याला

जगावे स्वत:सारखे, स्वत:च, नसावी इर्षा इतरांपरीस
तेव्हाच ईश्वरी मर्जी संपादित होईल सर्वांस.

**उर्मिला फडतरे**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय**


कल्याणवार्ता
जून, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/ १२५२/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


# खरे सुख

जीवनातील खऱ्या सुखाचे स्पष्टीकरण करताना अनेक थोर विचारवंत आणि समाजसुधारकांनी या अनुषंगाने येणाऱ्या सर्व गोष्टींचे दोन गट तयार केले आहेत. आपली कौटुंबिक व सामाजिक जबाबदारी पार पाडून इतरांना कल्याणकारी होतील अशी कामे करणे आणि दुसरा असा की ज्यामुळे मनाचे शुध्दिकरण होईल, अशी कामे करणे. स्वत:चे कल्याण हे इतरांच्या कल्याणाशिवाय पूर्ण होवू शकत नाही.

जेंव्हा जेंव्हा आयुष्यातील चढउतारांशी
सामना करावा लागतो
तेंव्हा देखील मन स्थिरच रहाते,
शोक नाही, दुर्भावना नाही
नेहमीच शांत, निर्भय, भयरहित वाटणे
हेच तर सर्वोत्कृष्ट सुख आहे।

काहीही घडत असो मग ते मनाच्या आतील असलेल्या विश्वाच्या सूक्ष्म प्रतिकृतीत असो, शरीरात असो किंवा बाहेरच्या जगात असो आपल्याला त्याच्याशी सामना अगदी सहज, मनात कोणत्याही प्रकारचा तणाव निर्माण न करता, राग व द्वेष येवू न देता, आंतरमनाच्या खोलीतून येणारे हास्य चेहऱ्यावर घेवून करता आला पाहिजे. प्रत्येक परिस्थितीत सुखात वा दु:खात, हवीहवीशी वा नकोशी असणारी, मनात यत्किंचितही चिंता व असुरक्षितता वाटायला नको. उलट मनात अनित्यतेच्या जाणीवेने येणारी पूर्ण सुरक्षितता पाहिजे. हाच खरा आनंद, हेच खरे सुख आहे.

# माझ्या लाडक्यास

तेंव्हा तु आम्हाला हाक मारीत होतास
तुझ्या आनंदात सहभागी होण्यासाठी
पण आमचे हात गुंतलेले होते
रोजची भाकरी मिळविण्यासाठी

तुला आम्ही हवे होतो
तुझ्याबरोबर खेळण्यासाठी
आणि आम्ही मात्र राबत होतो
आमच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी

जेव्हा तु बोलवत होतास
तुझ्या पुस्तकातील आनंद लुटण्यासाठी
आता वेळ नाही रे, उद्या सांगू हं
हेच उत्तर होतं आमचं तुझ्यासाठी

तुला रात्र ही उजाडायची
आमच्या सहवासाची भुक भागविण्यासाठी
आणि थकलेले-शिणलेले आम्ही
गाढ झोपायचो सकाळपर्यंत न उठण्यासाठी

भुर्रकन उडाले ते अनमोल क्षण
पुन्हा हातात न सापडण्यासाठी
तुझं लहानपण ते घेवून गेलं
तुला मोठं करुन गेलं आमच्यासाठी

आता तुला तुझं विश्व आहे
तुझे सोबती तुझ्याशी खेळण्यासाठी
आणि आमचे हात मात्र रिकामे उरलेत
आयुष्यातला आनंद शोधण्यासाठी

हरवली ती पुस्तके, ती खेळणी
ते गोड मुके, शुभं करोती नेहमीसाठी
सारं सारं आता जुनं झालं
फक्त आम्ही उरलो आमच्यासाठी

आता वाटतं घड्याळ उलटं फिरावं
फक्त एकदा काही वर्षांसाठी
तेंव्हा तु आम्हाला जे सांगत होतास
ते सारं सारं समजून घेण्यासाठी

❖❖❖ **स्नेहल गुद्देटी, सल्लागार (कामगार) कार्यालय** ❖❖❖

# जीवन

यश अपयशानं, जय पराजयाला
सामोरं जायचं असतं
जाताना अडखळायचं नसतं
कारण हे जीवन जगायचं असतं।

येणाऱ्या वाटा जाणाऱ्या वाटा,
वाटा अनेक, यातून चांगली वाट ओळखून
चालायचं असतं।
कारण हे जीवन जगायचं असतं

येताना माणसानं माणूसपणही
जपायचं असतं
दोषी कोणाला धरायचं नसतं।
कारण हे जीवन जगायचं असतं।

आनंदानं जगायचं असतं
आपले दु:ख इतरांना
कधी-कधी सांगायचं नसतं
कारण हे जीवन जगायचं असतं।

# विवेकानंदांचे उपदेश

१. सर्वदा स्वत:ला रोगी समजत राहणे, हा काही रोगमुक्त होण्याचा उपाय नाही. रोग दूर करण्यासाठी औषधांची आवश्यकता असते. दुर्बलतेचे स्मरण करुन दिल्याने काहीच लाभ होत नाही. बल द्या, शक्ती प्रदान करा. सर्वदा दुर्बलतेचा विचार केल्याने बल प्राप्त होत नाही. दुर्बलतेचेच सतत चिंतन करीत बसणे हा काही दुर्बलता दूर करण्याचा उपाय नाही. बलाचा नेहमी विचार करणे हाच उपाय आहे.

२. सर्व प्राण्यांपेक्षा, सर्व देवदेवतांपेक्षा मनुष्य हा अधिक श्रेष्ठ आहे. त्याच्याहून उच्च कुणीही नाही. देवांना देखील पृथ्वीवर पुन्हा जन्म घ्यावा लागतो आणि मानवदेहाच्या द्वारे मुक्ती प्राप्त करुन घ्यावी लागते. केवळ मनुष्यालाच पूर्णत्वाचा लाभ करुन घेता येतो. देवदेवतांना देखील नाही.

३. नीतिपरायण व्हा, वीर बना, निष्कपट बना. तुमच्या चारित्र्याला कोणत्याही प्रकारचा कलंक लागू देवू नका. प्रत्यक्ष मृत्यूशी सामना करण्याची हिंमत ठेवा. धर्माच्या निरनिराळ्या सिध्दांतांनी आपला मेंदू शिणवू नका. भित्री माणसेच पाप करीत असतात. जे खरे वीर असतात ते कधीच पाप करीत नाहीत. सर्वांवर प्रेम करण्याचा प्रयत्न करा.

४. फसवणूक करुन कोणतेही मोठे कार्य होत नसते. प्रेम, सत्यनिष्ठा व प्रचंड उत्साह यांच्याद्वारेच महान कार्ये होत असतात. म्हणून आपले वीरत्व प्रकट करा.